# (5) इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना

पात्रतेचे निकष, अटी व शर्ती

| | |
|---|---|
| 1 | वय - 18 ते 79 वर्ष वयोगटातील अपंग. |
| 2 | कुटुंबाचेउत्पन्न - कुटुंबाचे नांव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे. |
| 3 | आर्थिकसहाय्य/निवृत्तीवेतन - दारिद्र्यरेषेखालील कुटूंबाच्या यादीतील लाभार्थ्यांकरीता केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजनेमधून दरमहा रु.300/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते. याच लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेतून दरमहा रु.1200/- असे एकूण दरमहा रु.1500/- प्रतिलाभार्थी अर्थसहाय्य मिळेल. |
| 4 | पात्रतेचीअर्हता - दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नांव असणे आवश्यक आहे. |
| 5 | दिव्यांगत्वाचेप्रमाणपत्र - केंद्र शासनाच्या ज्ञापन क्रमांक J-11012/1/2009-NSAP, दिनांक 30 सप्टेंबर, 2009 मधील तरतुदीनुसार दिव्यांग असल्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हील सर्जन) यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| 6 | वयाचादाखला - ग्रामपंचायतीच्या / नगरपालिकेच्या / महानगरपालिकेच्या जन्मनोंद वहीतील उताऱ्याची साक्षांकित प्रत किंवा शाळा सोडल्याचा दाखला, किंवा शिधापत्रिकेमध्ये अथवा निवडणूक मतदार यादीत नमूद केलेल्या वयाचा उतारा किंवा आधार कार्ड इ. यापैकी एक पुरावा ग्राह्य धरण्यात यावा. सदर पुरावे उपलब्ध नसल्यास ग्रामीण/नागरी रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिकारी किंवा त्यापेक्षा वरीष्ठ दर्जाच्या शासकीय वैद्यकिय अधिकाऱ्याने दिलेला वयाचा दाखला ग्राह्य धरण्यात यावा. |
| 7 | उत्पन्नाचादाखला - दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती / कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा. |
| 8 | रहिवाशीदाखला - ग्रामसेवक / तलाठी / मंडळ निरीक्षक यांनी दिलेला रहिवाशी असल्याबाबतचा दाखला किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवाशी दाखलाही ग्राह्य धरण्यात येईल. |
| 9 | शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ घेत असलेली व्यक्ती इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहणार नाही. |
| 10 | एखाद्या विशिष्ट प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या व विहित अटी पूर्ण करीत असलेल्या अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याचे अधिकार शासनालासुध्दा राहतील. |